**L. A. BILL No. LX OF 2023.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA ELECTRICITY DUTY ACT, 2016.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०.**

**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

२०१६ चा महा. २६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (सात) मधील, " मेट्रो रेल्वे व मोनोरेल वगळता " हा मजकूर वगळण्यात येईल. २०१६ चा महा. २६.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यामध्ये नवीन कलम १५क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः—

शंका निरसन.

"**१५क.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, जी वीज,—

(क) भारत सरकारद्वारे वापरली जाते किंवा त्या सरकारच्या वापराकरिता भारत सरकारला विकली जाते, किंवा

(ख) भारत सरकारच्या कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरली जाते अथवा कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरण्यासाठी विकली जाते,

अशा विजेच्या (मग तिचे उत्पादन शासनाने किंवा इतर व्यक्तीने केलेले असो) वापरावर किंवा विक्रीवर कर लादण्यात येणार नाही किंवा कर लादण्यास प्राधिकृत करण्यात येणार नाही.".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या **अनुसूची क** ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या **अनुसूची क** मधील, "भाग छ-मोनो व मेट्रो रेल्वे" याच्याशी संबंधित असणारी अनुक्रमांक ७ येथील नोंद वगळण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०]**

**[महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.